|| सा विद्या या विमुक्तये ||

Yuvak Vikas Mandal's

# ARTS, COMMERCE, SCIENCE COLLEGE, BHALAVALI.

**Affiliated to University of Mumbai**

Tal. – Rajapur, Dist. – Ratnagiri, Pin – 416707.

Principal – 9922879978, Office – 9881574726.

Email- artscommercesciencecollagebhal@gmail.com

*************************************************************************************

Date – 22 July 2024.

## सूचना

महाविद्यालयातील सर्व विद्यार्थ्यांना कळविण्यात येते कि, ओणी पंचक्रोशी शिक्षण मंडळ,ओणी यांचे मार्फत प्रतिवर्षाप्रमाणे याही वर्षी 'प्रबोधनकार ठाकरे राज्यस्तरीय आंतरमहाविद्यालयीन वक्तृत्व स्पर्धा' दिनांक ३० ऑगस्ट २०२४ रोजी आयोजित करण्यात आली आहे. या स्पर्धेचे विषय आणि तपशील सोबत जोडलेल्या प्रसिद्धीपत्रकात दिले आहेत.

तरी ज्या विद्यार्थ्यांना या स्पर्धेमध्ये सहभाग घ्यायचा आहे त्यांनी १७ ऑगस्ट २०२४ पर्यंत प्रा.सविता घुगरे (९४०४४४९६१३) यांच्याकडे नावे नोंदवावीत.

१०. दि. ३१ ऑगस्ट २०२४ रोजी सर्वोत्तम २१ स्पर्धकांची उत्स्फूर्त स्पर्धा प्रत्येकी ३ मिनिटांची घेण्यात येईल.

११. दोन्ही स्पर्धांच्या गुणांमधून तीन सर्वोत्तम विजेत्यांना 'प्रबोधनकार युवा वक्ता पुरस्कार २०२४' प्रदान करण्यात येईल. त्याचबरोबर तीन स्पर्धकांचा उपविजेता म्हणून सन्मान करण्यात येईल.

१२. स्पर्धेसाठी आलेल्या सर्व स्पर्धकांची रहाण्याची व भोजनाची व्यवस्था आयोजकांमार्फत विनामूल्य करण्यात येईल.

१३. स्पर्धकांनी स्पर्धा सुरू होण्यापूर्वी अर्धा तास अगोदर कार्यक्रम स्थळी उपस्थित रहावे.

१४. परीक्षकांचा निर्णय अंतिम व बंधनकारक राहील.

१५. कोणत्याही अपरिहार्य कारणामुळे स्पर्धेत बदल करणे आवश्यक वाटल्यास तो अधिकार संयोजक मंडळाने राखून ठेवला आहे.

१६. सर्व सहभागी स्पर्धकांना प्रमाणपत्र देण्यात येईल.

१७. स्पर्धेचा पारितोषिक वितरण समारंभ शनिवार दि. ३१ ऑगस्ट २०२४ रोजी सन्मानपूर्वक होईल.

१८. ही स्पर्धा मराठी भाषेतून घेतली जाईल.

## - संपर्क -


**विनोद मिरगुले**


मोबा. ९९७०९५३६००, ८६६८८१०१७७

**महेंद्र पवार** - मोबा. ८१४९१८४८६४


### - पत्रव्यवहाराचा पत्ता -


**मा. संयोजक**

प्रबोधनकार ठाकरे राज्यस्तरीय आंतरमहाविद्यालयीन वक्तृत्व स्पर्धा
नूतन विद्यामंदिर व कनिष्ठ महाविद्यालय, ओणी
ता. राजापूर, जि. रत्नागिरी


(**टिप** : ओणी हे गाव मुंबई-गोवा महामार्गावर आहे. सर्व प्रकारच्या गाड्या येथे थांबतात. राजापूरपासून ११ कि.मी. तर रत्नागिरीपासून ६२ कि.मी. आहे.)



# सस्नेह निमंत्रण

ओणी पंचक्रोशी शिक्षण मंडळ, ओणीच्या
ज्ञानवंत ॲड. वासुदेव तुळसणकर ज्ञानसंकुलामध्ये आयोजित

# प्रबोधनकार ठाकरे
# राज्यस्तरीय आंतरमहाविद्यालयीन
# वक्तृत्व स्पर्धा

शुक्रवार दि. ३० ऑगस्ट व
शनिवार दि. ३१ ऑगस्ट २०२४

**वर्ष १९ वे**



## - स्थळ -

**गुरूवर्य शहाजी भाऊराव खानविलकर सभागृह**
**नूतन विद्यामंदिर व कनिष्ठ महाविद्यालय, ओणी**
**ता. राजापूर, जि. रत्नागिरी**

प्रति,
मा. प्राचार्य,

सस्नेह नमस्कार,

ओणी पंचक्रोशी शिक्षण मंडळाच्यावतीने 'प्रबोधनकार ठाकरे राज्यस्तरीय आंतरमहाविद्यालयीन वक्तृत्व स्पर्धे'चे आयोजन करण्यात आले आहे. या वर्षी ही स्पर्धा शुक्रवार दि. ३० ऑगस्ट व शनिवार दि. ३१ ऑगस्ट २०२४ रोजी होणार आहे. हे स्पर्धेचे १९ वे वर्ष आहे.

ज्ञानवंत ॲड. वासुदेव तुळसणकर ज्ञानसंकुलामध्ये जयवंत दळवी स्मृती राज्यस्तरीय एकांकिका स्पर्धा, साने गुरूजी जिल्हास्तरीय कथाकथन स्पर्धा, कै. पार्वतीबाई शंकर तुळसणकर स्मृती जिल्हास्तरीय वक्तृत्व स्पर्धांचे यशस्वी आयोजन करून ओणी शाळा 'स्पर्धा पंढरी' झाली आहे.

महाराष्ट्रात युवा वर्गात 'विद्यार्थीप्रिय स्पर्धा' म्हणून नाव होत आहे. दूर-दूरहून गुणवंत स्पर्धकांच्या सहभागाने दिवसेंदिवस स्पर्धेचा दर्जा उंचावत आहे. या वर्षीपासून युवा वक्ता पुरस्काराची रक्कम वाढवून उत्तेजनार्थ तीन पारितोषिके ठेवण्यात आली आहेत.

प्रबोधनकार युवा वक्ता पुरस्काराचे विजेते हे पाठांतरी वक्ता न होता चौफेर वाचन करून अभ्यासू वक्ता घडावा असा आमचा प्रयत्न आहे. त्यासाठी प्राथमिक फेरीतून २१ सर्वोत्तम स्पर्धकांची निवड करून त्यांची उत्स्फूर्त स्पर्धा घेण्यात येणार आहे. यामधून तीन सर्वोत्तम विजेत्यांना 'प्रबोधनकार युवा वक्ता पुरस्कार २०२४' प्रदान करण्यात येणार आहे.

पारितोषिक वितरण समारंभ सन्मानपूर्वक व्हावा असा आमचा प्रयत्न असतो. त्यासाठी पारितोषिक वितरण समारंभाला महाराष्ट्रातील नामवंत वक्त्यांना निमंत्रित केले जाते. यावर्षी प्रख्यात लेखक, पत्रकार, वक्ते मा. प्रा. संजय आवटे हे उपस्थित रहाणार आहेत.

ही स्पर्धा अनुभवण्यासाठी, विजेत्या वक्त्याचा मान मिळवण्यासाठी स्पर्धेत जास्तीत जास्त स्पर्धकांनी सहभाग घ्यावा, ही विनंती.

आपले,

| | |
|---|---|
| श्री. प्रदीप संसारे<br>कार्याध्यक्ष | श्री. वासुदेव तुळसणकर<br>अध्यक्ष |
| श्री. गणपत जानस्कर<br>कार्यवाह | श्री. तानाजी शिंदे<br>मुख्याध्यापक |

ओणी पंचक्रोशी शिक्षण मंडळ, ओणी, ता. राजापूर

# प्रबोधनकार ठाकरे राज्यस्तरीय आंतरमहाविद्यालयीन वक्तृत्व स्पर्धा २०२४

## -: स्पर्धेचे विषय :-

१) राजकारण्यांचा धर्म आणि धर्माचं राजकारण
२) व्यर्थ गेला तुका, व्यर्थ ज्ञानेश्वर....
३) राजकारणातील अभिनय आणि अभिनय क्षेत्रातील राजकारण
४) नवे शैक्षणिक धोरण - जखम मांडीला आणि मलम शेंडीला
५) सावधान ! लोकशाहीचा चौथा खांब ढासळतो आहे....

## प्रबोधनकार युवा वक्ता पुरस्कार २०२४

तीन सर्वोत्तम विजेत्यांना प्रत्येकी ७५००/- सन्मानचिन्ह, सन्मानपत्र प्रदान करण्यात येणार आहे. तीन उपविजेत्या स्पर्धकांना प्रत्येकी रूपये २०००/- व प्रमाणपत्र देण्यात येईल.

## - स्पर्धेचे नियम -

१. ही स्पर्धा महाविद्यालयीन ( इ. ११ वी ते इ. १५ वी, डी.एड., बी.एड., अभियांत्रिकी इ. ) विद्यार्थ्यांसाठी खुली आहे.
२. प्रत्येक महाविद्यालयातील फक्त दोनच स्पर्धकांना स्पर्धेत भाग घेता येईल.
३. या स्पर्धेसाठी येतेवेळी प्राचार्यांचे शिफारसपत्र, कॉलेजचे ओळखपत्र आणि आधार कार्ड झेरॉक्स आणणे बंधनकारक आहे.
४. सहभागी विद्यार्थ्यांचे वय २५ वर्षांपेक्षा जास्त नसावे.
५. आपली नावे दि. २८ ऑगस्ट २०२४ पर्यंत स्पर्धा संयोजकांकडे नोंदवावीत. नंतरची नावे नोंद करून घेतली जाणार नाही.
६. या स्पर्धेसाठी प्रवेश शुल्क प्रत्येकी रू. १००/- राहील.
७. या वक्तृत्त्व स्पर्धेची किमान वेळ ७ मिनिटे आणि कमाल १० मिनिटे राहील.
८. दि. ३० ऑगस्ट रोजी सकाळी ९.०० वा. स्पर्धा सुरू होईल.
९. प्राथमिक फेरीतून अंतिम फेरीसाठी २१ सर्वोत्तम स्पर्धकांची निवड होईल.